| | |
|---|---|
| | **महाराष्ट्र वस्तु व सेवाकर विभाग** |
| | राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय, ८ वा मजला, नवीन इमारत, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१०. |

**संदर्भ: - १) कार्यालयीन आदेश क्र. अविआ/ मरा/ कार्या.निहाय पदे/ पुनर्रचना कक्ष/ प्र.क्र. ५८/ब-३७८, दि. ०१.१२.२०११**

**२) कार्यालयीन आदेश क्र. अविआ/ मरा/ कार्या.निहाय पदे/ पुनर्रचना कक्ष/ प्र.क्र. ५८/ब-३४६, दि. २६.०५.२०१५**

## -: आदेश:-

**क्रमांक:** विविआ/ आस्था-३/ पुनर्रचना कक्ष/ प्र.क्र. ७७ मुंबई, दि. 18 JUL 2018

उपरोक्त संदर्भ क्र. २ मधील आदेशान्वये, मुंबई व पुणे वगळता इतर विभागातील व्यवसायकर अधिका-यांवर कार्यकारी नियंत्रण व प्रशासकीय नियंत्रण ठेवण्याबाबतची जबाबदारी राज्यकर सहआयुक्त (व्यवसायकर) यांच्याऐवजी राज्यकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन) यांच्याकडे सोपविण्याबाबत आली होती.

संदर्भ क्र. २ मधील आदेशांन्वये दिलेल्या निर्देशात खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

**मुंबई व पुणे येथील राज्यकर सहआयुक्त (व्यवसायकर) वगळता, ठाणे, कोल्हापूर, नाशिक व नागपूर येथील क्षेत्रीय राज्यकर सहआयुक्त (व्यवसायकर) यांच्याकडे त्यांच्या क्षेत्रातील व्यवसायकर अधिकाऱ्यांवर कार्यकारी नियंत्रण (Functional control) देण्यात येत आहे. तथापि संबंधित राज्यकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन) यांच्याकडे असलेले व्यवसायकर अधिकाऱ्यांवरील प्रशासकीय नियंत्रण (Aministrative control) यापुढेही कायम असेल.**

**हा आदेश दि. १ ऑगस्ट, २०१८ पासून अंमलात येईल.**

**(राजीव जलोटा)**
**राज्यकर आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत:- १) विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) अपर पोलीस महासंचालक तथा मुख्य दक्षता अधिकारी.
३) सर्व अपर राज्यकर आयुक्त.
४) सर्व राज्यकर सहआयुक्त.
५) राज्यकर आयुक्तांचे विशेष कार्य अधिकारी.
६) संबंधित अधिकारी.
७) निवडनस्ती.
८) स्थळप्रत.